
# गमड्रॉप आणि खट्याळ कुत्रा





ज्योला रात्री जेवणात सॉसेज खायची हुक्की आली म्हणून त्याने शहरात जायचा बेत केला. ज्यो 'गमड्रॉप' मध्ये, म्हणजे त्याच्या जुन्या विंटेज गाडीत जाऊन बसला, आणि त्याने आपल्या कुत्र्याला, हॉरेसला हाक मारली. "चल हॉरेस, जाऊन थोडा खाऊ घेऊन येऊ." हॉरेसने गाडीत मागच्या सीटवर उडी मारली.






हॅरिसला गमड्रॉप मधून फेरी मारायला फार आवडत असे. मागे आरामात उभं राहून त्याने हवेचा वास घेतला. किती मस्त वास होता! वारा लागून त्याचे नाक छान गार झाले, आणि कान नाचू लागले. हॅरिसने आनंदात शेपूट हलवली.





शहरात पोहोचल्यावर ज्योने बेकरीजवळ गमड्रॉप उभी केली. हॉरेसकडे हसून बघत ज्योने त्याचे डोके थोपटले. "शहाणं पिल्लू माझं." ज्यो प्रेमाने म्हणाला. "इथेच थांब, मी आलोच."





हॉरेस निमूट गाडीत बसून राहिला. त्याने हवेचा
वास घेतला. हवेत किती वेगवेगळे वास होते!
बेकरीतला ताजा ताजा पाव. वाह! अत्तर...पी.यू!
सगळे वास घेण्यात काय मज्जा येत होती!
हॉरेसने पुन्हा वास घेतला.
या खेपेला हॉरेसला सॉसेजचा वास आला!






सॉसेज!

हॉरेसला सॉसेज फार आवडत असे. तो ज्योने सांगितलेलं सगळं विसरला, शांत बसायला विसरला. त्याने रस्त्यावर उडी घेतली, आणि तिथे त्याला तीन सॉसेज सापडली!

हॉरेसचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आपल्या नाकावर सुद्धा विश्वास बसेना. त्याचा आपल्या नशिबावरच विश्वास बसेना!





हॉरेस आनंदाने केकाटला. त्याने पटकन सॉसेजस उचलले. सॅली शॉर्टने त्याचे केकाटणे ऐकले. तिचे लक्ष हॉरेसकडे गेले. त्याच्या तोंडातल्या सॉसेजेस कडे गेले. तिने तिच्या पिशवीत पहिले. हे तर तिचे सॉसेजस होते!





सॅली जोरात ओरडली. "धावा!" ती ओरडली. "त्या चोराला पकडा!" आजूबाजूचे लोक थांबून तिच्याकडे पाहू लागले. "त्या कुत्र्याने माझे सॉसेजस चोरले आहेत. मदत करा! त्याला धरा!" सॅली हात हवेत हलवत ओरडली. "थांबवा त्याला, धरा!"






तिच्या ओरडण्यामुळे हॅारेस बिथरला. तो रस्त्यातून धावत सुटला. सॅली त्याच्या मागे धावली. ती ओरडत होती. आजूबाजूचे लोकही त्याच्या मागे धावले. ते सुद्धा ओरडत होते. केवढा आरडाओरडा झाला! हॅारेस अजून जोरात पळाला.







हॉरेस सुसाट पळत एका दुकानात शिरला. सॅली आणि इतर लोक त्याच्या पाठोपाठ आत घुसले. ते जाऊन  दुकानातल्या सामानाला धडकले. दुकानातल्या लोकांना धडकले.



बटाटे एकीकडे पडले.
टोमॅटो दुसरीकडे पडले.
केवढा पसारा झाला! हॉरेस अजूनच जोरात धावू लागला.

हॉरेस दुकानातून सटकला. मागच्या दाराने बाहेर पडला आणि एका बोळात घुसला. तिथे त्याच्या समोर एक बुलडॉग आला. बुलडॉग केवढा मोठ्ठा होता! किती दुष्ट दिसत होता! आणि त्याला हवे होते हॉरेसच्या तोंडातले सॉसेज!





माघार कधी घ्यायची हे हॉरेसला बरोब्बर माहित होते. त्याने तोंड उघडले आणि सॉसेज खाली पडू दिले.



बुलडॉगने सॉसेजचा चावा घेतला.
तेवढ्यात सॅली आणि बाकी लोक त्या गल्लीत आले. हॉरेस पटकन त्यांच्या रस्त्यातून बाजूला झाला.
सॅलीने सॉसेज तोंडात धरलेल्या बुलडॉगला पहिले. "तो बघा!" तो ओरडली. "पकड त्याला!" सगळे लोक बुलडॉगमागे धावले. आणि हॉरेस परत आपल्या गाडीकडे धावला.





हॉरेसने मागच्या सीटवर उडी घेतली. थोड्याच वेळात त्याचा दम गेला. मग तो एकदम शांत बसून राहिला. थोड्या वेळाने ज्यो परत आला.

"किती शहाणं पिल्लू आहेस तू!" ज्यो प्रेमाने म्हणाला. "सांगितल्याप्रमाणे इथेच शांत बसून आहेस! हे घे, सॉसेज खा." तो म्हणाला. "शहाण्यासारखं वागल्याबद्दल बक्षीस!" हॉरेसने सॉसेज खाल्ले आणि जिभल्या चाटल्या. "हो ना," त्याने विचार केला. "एवढी सगळी धावपळ केल्यानंतर किती भूक लागली आहे! सॉसेज तर मिळायलाच हवं!"



**समाप्त**